**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

म्हाडा
MHADA

जावक क्रमांक – १९४४/१७ दिनांक :- ०४ मे, २०२३

प्रसिद्धीपत्रक

# म्हाडा सोडत अर्ज नोंदणीसाठी 'म्हाडा'च्या अधिकृत संकेतस्थळांचाच वापर करावा - श्री. मिलिंद बोरीकर

मुंबई, दि. ०४ मे, २०२३ :- मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे जाहीर करण्यात येणाऱ्या प्रस्तावित सदनिका विक्री सोडतीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील नागरिकांना सावधानतेचा इशारा देण्यात येत आहे की, सोडत प्रक्रियेत सहभागी होण्याकरिता म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळांवरूनच अर्ज नोंदणीकरण करून सोडत प्रक्रियेमधे सहभागी व्हावे आणि याव्यतिरिक्त याकामी कोणत्याही समाजमाध्यमांची, त्रयस्थांची, संस्थांची अथवा इतर मध्यस्थांची मदत 'म्हाडा'तर्फे घेण्यात आलेली नाही, असे स्पष्टीकरण मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर यांनी आज केले आहे.

मंडळातर्फे पत्रकाद्वारे श्री. बोरीकर यांनी नागरिकांना जाहीर आवाहन केले आहे की, आगामी सदनिका विक्री सोडतीच्या अनुषंगाने अनेक समाजमाध्यमे जसे Whastapp ग्रुप,Youtube, Facebook, अनधिकृत संकेतस्थळे, मुंबई मंडळाच्या येऊ घातलेल्या सोडतीबाबत 'म्हाडा'चे बोधचिन्ह अनधिकृतरित्या वापरुन म्हाडाच्या प्रकल्पांची, त्यांच्या आकारमानाची, किमतींची अवास्तव माहिती प्रसिद्ध करीत असल्याबाबत निदर्शनास आले आहे. ही समाजमाध्यमे नागरिकांना विशिष्ट लिंक पाठवून क्लिक करण्याबाबत सूचित करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे. करिता मंडळातर्फे आवाहन करण्यात येत आहे की, म्हाडातर्फे कोणतेही व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आलेले नाहीत अथवा कोणत्याही संकेतस्थळाला माहिती देण्यात आलेली नाही आणि अशाप्रकारे प्राप्त झालेल्या Whastapp ग्रुप्स अथवा संकेत स्थळावर जोडण्याकरिता प्राप्त झालेल्या लिंकवर सहभाग घेऊ नये, कोणतीही वैयक्तिक माहिती देऊ नये तसेच कोणतेही आर्थिक व्यवहार करू नये . या माध्यमातून नागरिकांची फसवणूक झाल्यास अथवा इतर कोणत्याही व्यवहारास मंडळ अथवा म्हाडा प्रशासन जबाबदार राहणार नाही.

श्री. बोरीकर यांनी जाहीर केले आहे की, सदनिका विक्रीकरिता मंडळाकडे निश्चित प्रणाली कार्यरत आहे. सदनिका विक्री सोडतप्रक्रियेत सहभागी होण्याकरिता https://www.mhada.gov.in तसेच https://housing.mhada.gov.in याच म्हाडाच्या अधिकृत संकेत स्थळांचा वापर करावा. तसेच अण्ड्रोइड मोबाइल फोनवर प्ले स्टोर आणि ॲपल मोबाइल फोनवर APP स्टोर मध्ये सोडतीचे ॲप्लिकेशन MHADA HOUSING LOTTERY SYSTEM उपलब्ध करून देण्यात आले आहे. मुंबई मंडळाच्या सदनिका विक्री सोडतीत सहभागी घेऊ इच्छिनार्यार अर्जदारांकरिता नोंदणीकरणाची प्रक्रिया अमर्याद सुरू आहे. यामध्ये मंडळाने निर्धारित केलेल्या कागदपत्रांची पूर्तता करून अर्जदार सोडतीत सहभागी होण्याकरिता आपली पात्रता निश्चित करून घेऊ शकतात. या प्रक्रियेकरिता नोंदणी निशुल्क असून कोणत्याही प्रकारे 'फी' अथवा शुल्काची मागणी केली जात नाही. तसेच ज्यावेळेस मुंबई मंडळातर्फे सदनिका विक्रीकरिता वर्तमानपत्रांतून व म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात येईल त्यावेळेस अर्जदारांना अर्ज रक्कम व अनामत रक्कम भरण्याकरिता लिंक खुली करण्यात येईल. ज्यामध्ये म्हाडाच्या बँक खात्याबाबतची माहिती नमूद करण्यात येईल.

तसेच मुंबई मंडळाने सदनिकांच्या विक्रीकरिता किंवा तत्सम कोणत्याही कामासाठी कोणालाही प्रतिनिधी/ सल्लागार/ प्रॉपर्टी एजंट/मध्यस्थ/ दलाल म्हणून नेमलेले नाही. अर्जदारांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्तीशी परस्पर आर्थिक व्यवहार करू नये आणि तसे केल्यास मंडळ अथवा म्हाडा प्रशासन जबाबदार राहणार नाही. नागरिकांना असेही आवाहन करण्यात येत आहे की, त्यांची अशाप्रकारे कोणी व्यक्ति/ दलाल काही प्रलोभने देऊन फसवणूक करीत असल्याचे आढळल्यास त्यांनी 'म्हाडा'च्या मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी तसेच उपमुख्य अधिकारी (पणन) मुंबई मंडळ यांचे कार्यालयास कळवावे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण